| | आरोग्य विभाग, जिल्हा परिषद, नागाळा पार्क, कोल्हापूर<br>२ब- आस्थापना |
|---|---|
| फोन नं- (०२३१) २६५२३२७<br>२६६१६५३<br>फॅक्स नं-(०२३१) २६८०३१२ | जा.क्र.कोजिप/आरोग्य/वशि-२ब/३१९९-३२०२/२०१८<br>दिनांक : १५ -१० - २०१८ |

वाचले :-

१. महा.शा. वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक वेतन-११०९/प्र.क्र.४४/सेवा ३ मंत्रालय, मुंबई. दिनांक ०१ एप्रिल, २०१०.
२. महाराष्ट्र शासन,वित्त विभाग,मंत्रालय,मुंबई.शासन परिपत्रक क्रं.वेतन-१२०९/प्र.क्र.६९/सेवा-९ दिनांक ०५मे, २०१०.
३. महा. शासन, वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक वेतन-११०९/प्र.क्र.४१/सेवा ३ मंत्रालय, मुंबई. दिनांक ०५ जुलै, २०१०.
४. महा.शासन, वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक वेतन-११११/प्र.क्र.८/सेवा-३ दि.०१ जुलै २०११
५. महा.शा., वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक आप्रयो/१०१५/प्र.क्र.-१११/प्र.क्र/२०१५ सेवा-३ दि.२३डिसेंबर २०१५
६. महा.शासन सा.प्र.वि.शा.निणर्य क्र.-एसआरव्ही २०१५/प्र.क्र.३०३/का.१२ दि. १२.०९.२०१६
७. महा.शासन वित्त विभाग शा.नि.क्र. मप्रन्या-२०१२/प्र.क्र.६९/२०१२/सेवा-३ दि.०७ ऑक्टोबर २०१६
८. महा.शासन वित्त विभाग शा.नि.क्र.मप्रन्या-२०१२/प्र.क्र.६९/२०१२/सेवा-३ दि. ९ डिसेंबर २०१६
९. पदोन्नती निवड समिती, जिल्हा परिषद, कोल्हापूर. सभा दि. ०१.१०.२०१८
१०. कार्यालयीन मंजूर टिपणी दिनांक :१०.१०.२०१८

## आदेश

संदर्भ क्र.१ ते ३ नुसार गट क व ड (वर्ग-३ वर्ग-४) मधील कर्मचाऱ्यांना पदोन्नतीची संधी उपलब्ध नसलेने आलेली कुंठीतता घालविणेसाठी दि.०१.१०.२००६ पासून सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना लागु करणेत आली होती. या आदेशानुसार खाली नमुद केलेले आरोग्य सहायक (पुरुष) पदावर १२ वर्षाची नियमित सेवा पुर्ण केलेल्या कर्मचाऱ्याच्या त्यांचे नावासमोर रकाना क्र. ७ मध्ये दर्शविले तारखेपासून **सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना अंतर्गत पहिला लाभ** वेतन बँड (पीबी २) ९३००-३४८०० ग्रेड पे ४२०० ने मंजूर करणेत येत आहे.

| अ क्र | कर्मचा-याचे नांव | मुख्यालय | | मुळ नियुक्ती दिनांक | आ.सहा पदावर पदोन्नती दिलेला दिनांक | पहिला लाभ देय दिनांक | देय वेतन श्रेणी | संगणक वसुलीस पात्र (वयाची ५० वर्षापर्यंत) कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | प्रा.आ. केंद्र / ता.कार्या | तालुका | | | | | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ |
| १ | संजय सखाराम गोडंगे | हुपरी | हातकणंगले | १२.१२.१९९६ | ०१.०४.२००५ | ०१.०४.२०१७ | (पीबी २) ९३००-३४८०० ग्रेड पे ४२०० | --- |
| २ | मानसिंग गणपती कांबळे (वाशिकर) | पं.स. पन्हाळा | पन्हाळा | ०२.०१.१९९८ | २४.०१.२००६ | २४.०१.२०१८ | | ०१.०१.०८ ते ३०.०६.०९ अखेर वसुली |
| ३ | कुमार गुंडु कांबळे | भुये | करवीर | ०६.१०.१९९४ | ०१.०४.२००६ | ०१.०४.२०१८ | | ०१.०१.०८ ते ३०.०६.०९ अखेर वसुली |
| ४ | राजाराम आनंदा तराळ | पट्टण कोडोली | हातकणंगले | २१.०२.१९९४ | २२.१२.२००४ | २२.१२.२०१६ | | --- |

अटी :-

१. या पदोन्नतीमुळे जबाबदारी आणि कर्तव्ये यात वाढ होत नसली तरी पदोन्नती प्रमाणें वेतन निश्चितीचा लाभ देण्यात येईल. मात्र वेतन निश्चितीचा मिळालेला लाभ हा त्याच वेतनश्रेणीत कार्यात्मक (Functional) पदोन्नती मिळाल्यावर पुन्हा देय होणार नाही.
२. नियमित पदोन्नती नाकारलेल्या तसेच नियमित पदोन्नतीस अपात्र ठरलेल्या कर्मचा-यांना या योजनेचा लाभ देय होणार नाही. या योजने अंतर्गत वरिष्ठ वेतनश्रेणी दिल्यानंतर नियमित पदोन्नती नाकारलेल्या वा नियमित पदोन्नतीस अपात्र ठरलेल्या कर्मचा-यांना देण्यात आलेला लाभ काढून घेण्यात येईल. मात्र लाभाची वसूली करण्यात येणार नाही.
३. पहिला अथवा दुसरा लाभ मंजूर केल्यानंतर ६ वर्षांनी कर्मचा-याच्या गोपनिय अहवालाची तपासणी करण्यात यावी. या ६ वर्षांतील त्याच्या गोपनीय अहवालातील त्याला अनुकुल असलेल्या कोणत्याही ३ गोपनीय अहवालांची सरासरी पहिल्या लाभाच्या प्रकरणी **ब (चांगली)** व दुस-या लाभाच्या प्रकरणी **ब + (निश्चित चांगली)** असणे आवश्यक राहीत. गोपनीय अहवालांची ही सरासरी प्रतवारी प्राप्त न केल्यास तसेच, कर्मचारी वैद्यकीय अथवा अन्य कारणास्तव अपात्र ठरल्यास त्याला मंजूर करण्यात आलेला यथास्थिती पहिला अथवा दुसरा लाभ काढून घेण्यात येईल व अशा लाभांची वसूली करण्यात येईल.
सदर वसुलीची संपूर्ण जबाबदारी संबंधित कार्यालय प्रमुखांची राहील.

४. संबंधीत कर्मचा-याचा पहिला लाभ काढून घेतला असेल तर त्यानंतरच्या पुढील प्रत्येक वर्षी त्याचा पहिला लाभ मंजूर करण्यासाठी विचार करण्यात यावा अशा कर्मचा-याचा थेट दुस-या लाभासाठी विचार केला जाणार नाही.

५. सुधारीत सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेच्या लाभाच्या दिनांकापासून अथवा त्याच्या पुढील वेतनवाढीच्या दिनांका पासून वेतन निश्चिती करण्याचा विकल्प देता येईल. योजनेच्या लाभाच्या दिनांकापासून वेतन निश्चिती करण्याचा विकल्प दिलेल्या अथवा तसे समजण्यात आलेल्या शासकिय कर्मचा-याच्या बाबतीत, त्याला २ जुलै ते १ जानेवारी या कालावधीत योजनेचा लाभ मिळाला असल्यास त्यास पुढील वेतनवाढ पुढील १ जुलै रोजी देण्यात यावी. परंतु, त्याला संबंधीत वर्षाच्या २ जानेवारी ते ३० जून दरम्यान योजनेचा लाभ मिळाला असल्यास त्यास पुढील वर्षाच्या १ जुलै रोजी वेतनवाढ मिळेल. विकल्प दि.३१ ऑगस्ट, २००९ च्या शासन निर्णयातील नमुन्यात कर्मचा-याकडून भरून घेण्यात यावा.

**६. सदर आदेशातील पात्र कर्मचारी हे दि.३१.१२.२००७ अखेर संगणक परिक्षा उर्तीण झालेले नाहीत व सुट मिळालेले नाहीत. अशा कर्मचाऱ्यांचे सदर सुधारित आश्वासित प्रगती योजनेच्या लाभानंतर मंजूर तारखेपासून या आदेशाच्या दिनांकापर्यंत देय होणारे सुधारित वेतन भत्ते फरक हा उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल केलेल्या रिट पिटीशीन नं. १२१४३/१८, १२९५९/१८ व १०७०७/१८ यांच्या अंतीम निर्णयापर्यंत आदा करणेत येवू नये. व अशा एखाद्या कर्मचाऱ्यास फरक आदा झालेस त्याची संपुर्ण जबाबदारी संबंधीत कार्यालय प्रमुखांच्यावर राहील.**

७. या योजनेतंर्गत पदोन्नती मिळाली तरी कर्मचा-याचे नांव कनिष्ठ (मुळ) संवर्गाच्या जेष्ठता सुचीत राहिल आणि सेवा प्रवेश नियमातील तरतुदीनुसार उपलब्ध रिक्त पदे योग्यवेळी नियमित पदोन्नतीसाठी (Functional Pramotion) त्यांचा विचार करणेत येईल. नियमित पदोन्नतीस अपात्र ठरलेल्या कर्मचा-यास या योजनेचा लाभ मिळणार नाही. या आधीच त्यांना (Insite) पदोन्नती दिली असल्यास मुळच्या पदावर पदावन्नत करण्यात येईल. अशा आशयाचे **"बंधपत्र"** कर्मचा-यांना लिहून द्यावे लागेल.

८. वरिल कर्मचा-यांनी खालील नमुन्यात संबंधीत अधिका-यासमोर **"बंधपत्र"** पूर्ण करून देणेच आहे.

**"बं ध प त्र"**

मला कोल्हापूर जिल्हा परिषदेने वरिष्ठ उच्च वेतनश्रेणी लागू केलेल्या दिनांकानंतर सेवा प्रवेश नियमातील तरतुदी प्रमाणे मला वरिष्ठ पदावर पदोन्नती दिलेस व ती पदोन्नती मी जर नाकारली तर मला मंजूर केलेली **"वरिष्ठ उच्च वेतनश्रेणी"** रद्द करून मूळ पदावरील वेतनश्रेणी लागू करण्यास माझी काही हरकत नाही. सदरचे बंधपत्र मी स्वखुषीने लिहून देत आहे याची मला पूर्ण जाणीव आहे.

सही /-
ठिकाण :-
दिनांक :-

(कर्मचा-याचे नांव)
हुद्दा, कार्यालयाचे नांव

समोर

संबंधीत अधिका-याची सही व शिक्का.

९. सदर आदेशाचा अंमल सत्वर करणेचा आहे.

**सही/-**
**मुख्य कार्यकारी अधिकारी,**
**जिल्हा परिषद, कोल्हापूर**

प्रति,
श्री.---------------------------, प्रा.आ.केंद्र ------------ ता. -------- जि.कोल्हापूर यांना योग्य त्या मार्गाने रवाना.

प्रत माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी :-
वैद्यकिय अधिकारी, प्राथमिक आरोग्य केंद्र --------- ता. -------- जि.कोल्हापूर.

२/- संबंधीत कर्मचा-याकडून दोन प्रतित **"बंधपत्र"** लिहून घेवून त्याची नोंद मुळ सेवा पुस्तकात घ्यावी. बंधपत्राची एक प्रत सेवा पुस्तकात समाविष्ठ करावी व दुसरी प्रत या कार्यालयास सादर करावी.

प्रत माहितीसाठी :-
१. गट विकास अधिकारी, पंचायत समिती ----------- ता. ---------- जि.कोल्हापूर.
२. तालुका आरोग्य अधिकारी, पंचायत समिती ------------ ता.---------- जि.कोल्हापूर.
३. दप्तर क्र.८ बजेट, आरोग्य विभाग, जिल्हा परिषद, कोल्हापूर.

प्रत माहितीसाठी सविनय सादर :-
१. मा.उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सा.प्र.) जिल्हा परिषद, कोल्हापूर.
२. मा.मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद, कोल्हापूर.

**मुख्य कार्यकारी अधिकारी,**
**जिल्हा परिषद, कोल्हापूरकरीता**